**म. सं. कौ. हिं. का. अर्ज २८/२०२२**

**नि.क्र. १८ लगत**

**शपथेवर साक्षीदाराची साक्ष  अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १**

माझे नांव –  मनिषा रघुनाथ गाढे,
वय -   ३३ वर्षे,  व्यवसाय – शेती,
राहणार –  हातगांव  ता. शेवगांव  जि. अहमदनगर.

साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास सामनेवालातर्फे वकील श्री.एस.बी.सानप यांचे मार्फत ः-

३.  माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. माझे शिक्षण नगर आणि हातगांव येथे झाले आहे. मला मळेगांव हे गाव माहिति आहे. माझे पहिले लग्न मळेगांव येथील व्यक्तीशी झाल्यामुळे मला मळेगांव माहिती आहे. माझे मळेगांव येथील संतोष तुकारा तागड यांच्यासोबत दि. २२.०४.२००४ साली लग्न झाले होते. मी मळेगांव येथे चार महिने नांदले. मला माझ्या सासुने त्रास दिल्यामुळे मी संतोष तागड यांच्यासोबत नांदले नाही. संतोष तागड यांच्यासोबत माझे वाद होत होते. हे म्हणणे खरे आहे की, संतोष तागड यांच्यासोबत यांच्यासोबत वाद झाल्यामुळे मी माझ्या माहेरी राहण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे आहे की, मी संतोष तागड आणि त्याच्या कुटुंबीयांविरुध्द न्यायालयात तक्रारी केलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणांमध्ये संतोष तागड यांच्याकडुन पैशांची मागणी केली. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर प्रकरणांमध्ये संतोष तागड यांच्याकडुन पैसे घेतल्याने वाद मिटवले.

४.  सामनेवाला नं. १ यांची पुतणी हातगांव  येथे असल्याने सामनेवाला नं.१ हे आमच्या माहितीचे होते. मी संतोष तागड यांच्यापासुन लग्नानंतर सहा महिन्यात विभक्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, संतोष तागड यांच्याविरुध्द शेवगांव कोर्टातच प्रकरण दाखल केले होते, व शेवगांव कोर्टातच आमचे आपसात मिटले होते.  हे म्हणणे खरे आहे की, माझा व संतोष तागड यांचा कायदेशीर घटस्फोट झालेला नाही.

५.  हे म्हणणे खरे आहे की, संतोष तागड याचेविरुध्द आमचे वाद मिटल्यानंतर माझ्या घरच्यांनी माझ्या दुस–या लग्नासाठी स्थळ बघण्यासाठी सुरुवात केली. हे म्हणणे खरे आहे

की, माझ्या वडीलांनी माझ्या लग्नासाठी सामनेवाला नं. १ यांचे स्थळ पाहिले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाआधी आम्हाला सामनेवाला नं. १ चे पहिले लग्न झाले आहे अशी माहिती दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला हळु बालल्यावर ऐकायला येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला पहिल्यापासुन कमी ऐकायला येते.

६. रंभा ही माझी सवत आहे. रंभा हीचे माहेर गुंडवाडी ता. गेवराई हे आहे. रंभा हीला दोन भाउ असुन ते औरंगाबाद येथे राहतात. माझे रघुनाथ याच्यासोबत लग्न हातगांव येथे झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न माझ्या घरासमोर साध्या पध्दतीने झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नासाठी रंभा आणि तिचे दोन्ही भाउ हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लग्नाच्या वेळी रंभा यांचा धाकटा भाउ हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, रंभा याच्या धाकटयाभावाने आमचे लग्न जमवले. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न करुन देण्यात रंभाच्या भावाचा पुढाकार असल्याने तो लग्नाच्या प्रत्येक विधीला हजर होता.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी सासरी नांदायला गेले त्यावेळी तेथे रंभा राहण्यास होती. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि माझी सवत एकत्रीतपणे सामनेवाला नं. १ सोबत नांदत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे लग्न मला मान्य नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर तीन महीने रंभा हीने मला बहिणीसारखे चांगले वागवले. हे म्हणणे खरे नाही की, मी व सामनेवाला हे एकाच छपरात राहण्यास होतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या एका छपरात कुडाचे पार्टीशन करुन दोन खोल्या केलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील एका खोलीत स्वयंपाक पाणी होत होते.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी सासरी नांदत असतांना मला करमत नाही असे म्हणुन महीना महीना माहेरी येवून राहत असे. हे म्हणणे खरे नाही की, मला सासरी परत घेवून जाण्यासाठी सामनेवाला व नातेवाईक येत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना म्हणत असे की, माझ्या मनाविरुध्द लग्न लावलेले आहे, माझी सवत तीथे राहत आहे म्हणुन मी नांदायला येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला यांना माझ्या सोबत संबंध ठेवायचे नाही मी तुम्हाला मुळ बाळ देणार नाही असे म्हणत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी असतांना माझा भाउ मला समजवून सांगुन सासरी नांदायला घेवून जात असे. हे म्हणणे खरे नाही मी सासरी नांदताना रात्री बेरात्री घराबाहेर निघुन जात असे. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला यांच्यासोबत रात्री बेरात्री भांडण करुन निघुन जात असत.

९. हे म्हणणे खरे आहे की, सासरी मी व सामनेवाला असे तिघे राहायला होता. हे

म्हणणे खरे आहे की, माझ व रंभाचे वाद व्हायचे म्हणुन मी व रंभा त्याच छपरात वेगवेगळया राहु लागलो. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला नं. १ यांनी रंभाशी बोलु नये, तिच्याकडे जायचे नाही यावरुन मी वाद घालत असे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवालांशी वाद करुन पुन्हा माहेरी निघुन यायचे.

**( न्यायालयाची वेळ संपलयाने साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब. )**

श्रवणोत्तर स्वीकृति

sd/-
(मोनाली अ.बेंद्रे)
२रे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
शेवगाव.

दिनांक-०४.१२.२०२४